# आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय

## परिपत्रक

क्र.सीएलआर.११२००१/४२०३८/१३/५-ब मुंबई, ३ सप्टेंबर २००२.

महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ चा नियम ६(२३) मधील तरतुदीनुसार १८०,३७५ व ७५० मि.लीच्या बाटल्यांतुन देशी मद्य भरण्यास परवानगी आहे. तसेच उपरोक्त आकारमानाखेरीज इतर आकारमानाच्या बाटल्यांत मद्य भरण्यास परवानगी देण्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. काही घटकांना १०० मि.ली.च्या व काही घटकांना ५०० मि.ली. व १००० मि.लीच्या आकारमानाच्या बाटल्यांत मद्य भरण्यास परवानगी दिली आहे. तसेच काही घटकांना काचेच्या बाटल्यांऐवजी पेट (pet) बाटल्यांमध्ये मद्य भरुन विक्री करण्यास परवानगी दिली आहे. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक क्र.सीएलआर.१०८४/Lab/XI-B दि.२८.५.१९८५ अन्वये बाटल्यांवर लावावयाच्या लेब्लसचे आकार व त्यावरील छापावयाच्या अक्षरांचे आकार विहीत करण्यात आले आहेत. मात्र उपरोक्त आकाराच्या बाटल्यांत मद्य भरण्यास परवानगी दिली तरी त्यांच्या लेबल्सचे आकार व लेबल्सवरील मजकुराबाबत उपरोक्त परिपत्रकात आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात आल्या नव्हत्या. फक्त काही घटकांना १०० किंवा ५०० मि.ली. किंवा १००० मि.ली.च्या बाटल्यांत मद्य भरण्यास परवानगी देणे किंवा जे घटक अर्ज करतील फक्त त्यांनाच अशी परवानगी देणे ही बाब योग्य नसल्यामुळे यापूर्वी या विषयावर निर्गमित केलेली सर्व परिपत्रके अधिक्रमित करुन पुढील प्रमाणे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३चा नियम ६(२३) मध्ये नमुद केलेल्या आकाराच्या बाटल्यांखेरीज ६० मि.ली., ९० मि.ली., १०० मि.ली. ५०० मि.ली. व १००० मि.ली.च्या बाटल्यांत मद्य भरण्यास सर्व घटकांना परवानगी देण्यात येत आहे. मात्र त्याबाबतचे निर्मितीमुल्य घोषित करुन किरकोळ विक्रीच्या कमाल किंमती अधीक्षकांकडुन मान्य करुन घ्याव्या लागतील.

२. उपरोक्त आकाराच्या काचेच्या किंवा पेट बाटल्यांचा वापर करता येऊ शकेल. मात्र पेट बाटल्यांचा वापर करण्यापूर्वी सदर बाटल्या वापरण्यास योग्य असल्याबाबत CENTRAL FOOD TECHNOLOGICAL RESEARCH INSTITUTION, MYSORE - ५७० ०१३, कर्नाटक यांच्यांकडुन त्याबाबतचा दाखला प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

Scanned by CamScanner